आजचा दिनविशेष
१९८७ : ओझोन चा थर कमी होण्यापासून संरक्षण करण्यासाठी मॉन्ट्रियल प्रोटोकॉलवर स्वाक्षरी झाली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार १६ सप्टेंबर २०२५ | अंक २६७० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक
I'TIME in TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555


# बंजारा समाजाचा विराट मोर्चा

## एसटी प्रवर्गातून आरक्षण मागणी लाखोंच्या संख्येने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला बंजारा जनसागर











### धर्मगुरू बाबूसिंग महाराज मोर्चा रॅलीत सहभागी

बंजारा समाजाची कशी समजल्या जाणाऱ्या पोहरादेवी देवी येथील महंत बाबूसिंग महाराज बीड येथील एसटी आरक्षण मोर्चा रॅलीत सहभागी झाले होते.

### पारंपरिक वेशभूषेतील महिलांनी वेधले लक्ष

हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावा या मागणीसाठी सोमवारी भव्य दिव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये जिल्ह्यातून दाखल झालेल्या महिला भगिनींना पारंपरिक वेशभूषेत येत आपली मागणीची घोषणा देतांना शहरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते.

### एकीचे न नेकीचे दर्शन

जिल्ह्यातून दाखल झालेल्या बंजारा समाज बांधवांकडून मोर्चा सुरू झाल्यापासून ते समारोप होऊ पर्यंत एकजुट दाखवत शिस्तीत आणि शांतता प्रिय मोर्चा पार पडला. त्यानंतर पोलीस प्रशासनाला सहकार्य करत समारोप करण्यात आला.

### भविष्याच्या लढाईसाठी चिमुकल्याच्या हाती फलक

जिल्ह्यातील तांड्यांमधून सर्वच समाजबांधव आरक्षण मागणीसाठी रस्त्यावर उतरले होता. यावेळी अनेक माताभगिनीसोबत लहान लेकर मोर्चात सहभागी झाले होते. यावेळी अनेक लेकरांचकडून स्वतःच्या भविष्यासाठी सुरू असलेल्या लढाई घोषणेचे फलक घेऊन मोर्चात सहभागी झाल्याचे दिसले.

### मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन काळा दिन साजरा करणार

लाखोंच्या संख्येने दाखल झालेले बंजारा बांधव आपल्या न्याय हक्काची मागणी करत आहे. इंग्रज सरकारांपासून ते निजाम सरकारांपर्यंत सर्वांनीच बंजारा समाजाला आदिवासी म्हणून नोंदी केलेले आहेत. इतर सर्व राज्यात बंजारा समाजाला एसी आणि एसटी मध्ये आरक्षण आहे मग महाराष्ट्रातच व्हीजेएनटी आणले कुठून? असा सवाल उपस्थित करत मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पहिले आरक्षण बाबत हालचाली न केल्यास मराठवाडा मुक्ती संग्राम दिन काळा दिन म्हणून महाराष्ट्रातील बंजारा समाज साजरा करणार असे मोर्चाला संबोधित करणाऱ्या मुलींनी व्यक्त केली.

### यांनी दिला मोर्चात जाहीर पाठींबा

मराठा योद्धा मनोज जरांगे यांच्या सूचनेवरून मराठा कृती समितीचा जाहिर पाठींबा, धनगर महासंघ, वंजारी महासंघ, आ.धनंजय मुंडे, आ. विजयसिंह पंडित, आ. संदीप क्षीरसागर यांनी मोर्चात सहभागी होत जाहिरात पाठिंब्याचे पत्र दिले.

### आरडीसी यांनी मोर्चात येऊन स्वीकारले निवेदन

जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडकल्यानंतर मोर्चा ठिकाणी प्रशासनाने येऊन निवेदन स्वीकारावे अशी मागणी करण्यात आली होती. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी मोर्चा ठिकाणी येत मुलींच्या हस्ते निवेदन स्वीकारावे.

### रस्त्यावरची अन कायदेशीर लढाईत मी सोबत- आ.धनंजय मुंडे

अनेक वर्षापासूनच्या असलेल्या मागणीला वाचा फुटली आहे. तर राज्यात असलेल्या बंजारा बांधवांना एसी आणि एसटीचा आरक्षण मग आमच्या महाराष्ट्रातीलच बंजारा बांधवांनी काय पाप केले. सरकारने एका समाजाला हैदराबाद गॅझेट लागू केले तोच गॅझेट बंजारा समाजाला लागू करून एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे. माझे नशीब नेहमीच बलत तर आहे मी आज सरकारच्या मंत्रीपदावर नाही म्हणून मला समाजाच्या न्याय मागणीला रस्त्यावरची लढाई लढताना येता आले. समाजाच्या रस्त्यावरच्या आणि कायदेशीर लढाईत मी सोबत राहणार असून सरकारला आरक्षण देण्यासाठी मागणी करणार असे मत आ. धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले.

### विधिमंडळाच्या अधिवेशनात लक्षवेधी करणार- आ.विजयसिंह पंडित

बंजारा समाजाच्या कुठल्याही लढाईत शिवछत्र परिवार कायम सोबत राहिला आहे. आज लाखोंच्या संख्येने दाखल झालेल्या न्याय हक्काची लढाईत पंडित कुटुंबीय नेहमी सोबत राहिला आहे. यापुढे सोबत राहत फक्त पाठींबाच देत नसून येणाऱ्या काळात विधिमंडळाच्या अधिवेशनात लक्षवेधी मांडणार असल्याचे मत गेवराईचे आ.विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केले.

बीड, ता.१५ :- बंजारा समाज हक्काचा वाटा मागतोय, आम्ही भिक मागत नाहीत, आम्ही कोणाच्या ताटातलं मागत नाहीत किंवा कोणाचे खरकटे सुध्दा मागत नाहीत. कारण बंजारा समाज हा स्वाभिमानी समाज आहे. बंजारा समाज एवढा लाचार सुध्दा नाही की कोणाचं खरकटं मागेल अशा शब्दात भावना व्यक्त करत बंजारा समाजाला एसटीचे आरक्षण लागू करा, १७ सप्टेंबर पुर्वी एसटी आरक्षणाची घोषणा करा अन्यथा मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन काळा दिन म्हणून साजरा केला जाईल असा इशारा बंजारा समाज बांधवांनी आजच्या विराट मोर्चातून राज्य सरकारला दिला आहे. बीडमध्ये सकल बंजारा समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी सोमवारी दुपारी एक नंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सुरू झालेला मोर्चा माळीवेस, सुभाष रोड, आण्णाभाऊ साठे चौक, बसस्टँड समोरून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चामध्ये बंजारा समाज पारंपारिक वेषभुशेत सहभागी झाला होता. एकच मिशन एसटी आरक्षण अशा घोषणांचे फलक हाती घेतलेल्या समाज बांधवांनी एसटी आरक्षणाची आग्रही मागणी सरकार आणि प्रशासनासमोर मांडली. या मोर्चाला जिल्हाभरातून बंजारा समाज बांधव प्रचंड मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बंजारा समाजातील युवतींनी मोर्चाला संबोधित केले. यावेळी मोर्चात बंजारा समाजाचे धर्मगुरू बापूसिंग महाराज, आ.धनंजय मुंडे, आ. विजयसिंह पंडित, आ.संदीप क्षीरसागर, मराठा समन्वयक, गंगाधर काळकुटे, योगश क्षीरसागर यांच्यासह समाज बांधव लाखोंच्या संख्येने सहभागी झाला होता.

# अभियंता दिन बीड मध्ये साजरा



बीड: दि१५/९/२५ भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा जन्मदिवस अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो त्यानिमित्ताने बीड जिल्हा कन्सल्टिंग इंजिनियर्स असोसिएशन तर्फे अभियंता दिन उत्साहात साजरा केला यावेळी बीड नगर परिषदेचे मुख्याधिकारी श्री फडसे साहेब आणि इंजिनियर श्री कुलदीप जी धुमाळे यांची प्रमुख उपस्थिती होती त्यांच्या हस्ते सर विश्वेश्वरैय्या यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच दीप प्रज्वलन केले गेले, असोसिएशनचे अध्यक्ष श्रीपाद चिंचोलकर यांनी प्रास्ताविक केले त्यानंतर श्री धुमाळे सर तसेच श्री फडसे साहेबांनी मार्गदर्शन केले श्री अल्तमश बागवान यांनी सुंदर सूत्रसंचालन केले कार्यक्रमास इंजिनीयर दादासाहेब बोरखेडे, वासुदेव हुलजुते, संकेत तांदळे, मनोज पुजारी, जाहेद पटेल, अभिषेक देशमाने, रवि वारे, रमेश बहिर ही संघटनेची कार्यकारणी तसेच शहरातील सर्व कन्सल्टिंग इंजिनियरची व ज्येष्ठ इंजिनियर्सची उपस्थिती होती,

# अतिवृष्टीने जिल्ह्याला झोडपले; नुकसानीचे तातडीने पंचनामे करा

## खा.बरजंग सोनवणे यांचे पालकमंत्री अजित पवार यांना पत्र



बीड: दि.१४ आणि १५ सप्टेंबर रोजी रात्री असे सलग दोन दिवस बीड जिल्ह्यावाशीयांना अतिवृष्टीने झोडपले आहे. यामुळे जिल्ह्यातील सर्व नद्या दुथडी भरून वाहत आहेत. परिणामी, शेतकऱ्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक भागात पिके पाण्यात असून काही ठिकाणी नदीपात्राशेजारील जमीनी देखील खरडून गेल्या आहेत. शिवाय घरांची देखील पडझड झालेली असून नुकसानीचे तातडीने पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. पालकंत्री पवार यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, बीड जिल्ह्यात सलग पावसामुळे अनेक ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. सकाळी सात वाजल्यापासून स्वत: परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील कडा गावातील ११, चोभा निमगावातील १४, घाटा पिंपरीतील ७, पिंपरखेडातील ६, धानोऱ्यातील ३ व डोंगरगणमधील ३ नागरिक असे मिळून ४४ लोक अडकलेले होते. याच बरोबर जिल्ह्यातील बीड तालुक्यातील नाळवंडी, नेकनूर, येळंबघाट, आष्टी तालुक्यातील दौलावडगाव, धानोरा, कडा, पिंपळा, टाकळसिंग, दादेगाव, अंबाजोगाई तालुक्यातील लोखंडी, पाटोदा, केजमधील केज, यूसूफ, होळ, शिरूर तालुक्यातील शिरूर महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद आहे. आष्टी तालुक्यात तर कडा आणि परिसरात ढगफुटीसदृस्य पाऊस झालेला आहे. कधी नव्हे ते नदीला मोठा पुर आला. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होत. तर अनेक भागात मुसळधार पावसामुळे विविध नद्यांच्या पाण्याने पात्र ओलांडल्याने शेतात पाणी शिरल आहे. शिवाय जमीन खरडून गेल्या आहेत. यामुळे पिकांचे आणि शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. याच बरोबर काही भागात घरांची पडझड देखील झाली आहे. आष्टी तालुक्यात पुराचे पाणी घरात घुसून संसारोपयोगी साहित्याचेही नुकसान झाले आहे. यामुळे शासनाने तातडीने स्पॉटवर जावून पंचनामे करावेत, व सरसकट नुकसान भरपाई द्यावी, असे पत्रात म्हटले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १६ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## आता फोनवरुन एका स्कॅनने कॅश काढता येणार, एटीएमची गरजच नाही,




आता युपीआय कॅश काढण्यासाठी देखील वापरता येणार आहे. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ( NPCI ) आता क्युआर कोड स्कॅन करताच कॅश काढण्याची सुविधा सुरु करण्याची तयारी करीत आहे. यासाठी लाखो बिझनस करस्पॉन्डन्ट्स ( BCs ) उदा. किराणा दुकानदार वा छोटे सर्व्हीस पॉईंटवर क्यूआर कोड उपलब्ध असतील. आणि ग्राहक आपल्या मोबाईलवरील कोणत्याही युपीआय ऐपने कोड स्कॅन करुन रोख रक्कम काढू शकणार आहेत.

काय आहेत डिटेल्स इकॉनॉमिक टाईम्सच्या बातमीनुसार नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने या नव्या सुविधेसाठी ( देशात रिटेल पेमेंट्स आणि सेटलमेंट सिस्टीम चालवणारी संस्था ) आरबीआयची मंजूरी मागितली आहे. युपीआयद्वारे रोकड काढण्याची बिझनस करस्पॉन्डन्ट्स ( BCs ) वर देखील मिळावी यासाठी ही मंजूरी मागितली आहे. बातमीनुसार NPCI च्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की ही योजना अद्याप प्राथमिक अवस्थेत असून त्यावर अजून अंतिम निर्णय झालेला नाही.

सध्या युपीआयवरुन कार्डलेस कॅश काढण्याची सुविधा केवळ युपीआय सुविधेने सुसज्ज असलेल्या एटीएमवरच आहे किंवा निवडक दुकानदारांकडे ही सुविधा आहे.

ही सुविधा मर्यादित रकमेसाठी आहे. उदा. शहरे आणि निमशहरा केवळ एका ट्राक्झंशनवर केवळ १००० रुपये रोखीने काढता येतात. ग्रामीण भागात ही मर्यादा २००० रुपयांपर्यंत आहे. आता योजनेनुसार ही सुविधा संपूर्ण देशातील २० लाखांहून बिझनस बिझनस करस्पॉन्डन्ट्स (BCs)पर्यंत पसरवली जाणार आहे.

BCs कोण आहेत ?

हे छोटे – छोटे केंद्र वा लोक आहेत जे दुर्गम वा बँकींग सुविधा नसलेल्या भागात असतात आणि बँके शाखेचे एक्सटेंशन म्हणून काम करतात. म्हणजे हे लोकांना बँकींग आणि वित्तीय सेवा पोहचवण्यास मदत करतात. NPCI ने साल २०१६ मध्ये युपीआय तयार केले आणि लाँच केले होते.

कसे करेल काम –

सहकार आणि बँकींग सेक्टर युपीआयने रोख रक्कम काढण्याच्या सुविधेवर काम करत आहेत. जेव्हा कोणताही ग्राहक BC आऊटलेटवर जाईल तेव्हा तो युपीआयने क्यूआर कोड स्कॅन करेल.

ग्राहकाला जेवढी रोकड हवी तेवढी रक्कम त्याच्या खात्यातून डेबिट होईल

# बीड जिल्ह्यात पुरात भारतीय लष्करी दक्षिण कमांडच्या थार रॅप्टर्स विमानदलाची जलद बचाव मोहीम

बीड,दि.१५: बीड जिल्ह्यात अचानक आलेल्या महापुरामुळे अनेक गावे जलमय झाली आणि काही तासांतच शेकडो कुटुंबे अडकून पडली. या आपत्कालीन परिस्थितीला तातडीने प्रतिसाद देत भारतीय लष्कराने नागरी प्रशासनाच्या समन्वयाने व्यापक बचाव मोहीम हाती घेतली. दक्षिण कमांडच्या थार रॅप्टर्स ब्रिगेड मधील लष्करी विमानदलाची हेलिकॉप्टर्स अल्पावधीतच पाचारण करण्यात आले होते. प्रतिकूल हवामान व कठीण उड्डाण परिस्थितीला तोंड देत वैमानिकांनी दुर्गम व जलमग्न भागांत प्रवेश करून अडकलेल्या नागरिकांची सुटका केली. महिलांसह मुले व ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात येत असून, सततच्या उड्डाणांद्वारे बचाव कार्य अखंडपणे सुरू आहे. एनडीआरएफ व राज्य यंत्रणांच्या सहकार्याने राबविण्यात आलेली ही मोहीम, नागरिकांच्या जीवित रक्षणासाठी भारतीय लष्कराची अखंड वचनबद्धता आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात त्वरित मदत करण्याची तत्परता अधोरेखित करत असल्याचे पुणे येथील, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार, मुख्यालय दक्षिण कमांड, प0जनसंपर्क अधिकारी, अंकुश चव्हाण यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. **

# पोषण आहार आणि आरोग्य विषयावर : एक दिवसीय प्रशिक्षण संपन्न.

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : राष्ट्रीय पोषण माह निमित्त पोषण आहार व आरोग्य विषयक प्रशिक्षणा साठी नांदेड जिल्ह्यातील 30 अंगणवाडी शिक्षिका, सेविका, कृषि सखी, व इतर महिला अश्या एकूण 60-70 महिलांचा समावेश होता. सौ. अल्का पवळे (गृह विज्ञान तज्ञ) के. वि. के. पोखर्णी यांनी पोषण आहाराबद्दल जनजागृती करण्याच्या हेतुने सदरील प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. माधुरी रेवणवार (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख) के.वि.के. सगरोळी नांदेड-2 व सौ.ज्योती तुप्तेवार (अंगणवाडी पर्यवेक्षिका) यांची विशेष उपस्थिती लाभली. डॉ. अमिता क्षत्रिय (कृषि विस्तार तज्ञ) कृ.वि.कें.पोखर्णी यांनी कार्यक्रमा चे सूत्रसंचालन केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. देवीकांत देशमुख (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख) के. वि. के पोखर्णी, यांनी सादर केले. त्यामध्ये त्यांनी माहिलांनी आहार व आरोग्यची काळजी घेण्याचे आवाहन करुन पोषण आहार बद्दल जनजागृती करणे का गरजेचे आहे यावर प्रकाश टाकला. यानंतर डॉ. माधुरी रेवणवार मॅडमने उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले महिलांनी जे वैविध्य पूर्ण पदार्थ सदरील मूल्यवर्धित पाककला स्पर्धे मध्ये बनवले होते,त्याचा सोप्या आणि सहज पाक कृती करून इतर महिलांना त्याचे प्रात्यशिक दाखवावे तसेच चांगल्या आहारा बरोबर, शारीरिक व मानसिक आरोग्यावर भर द्यावा आणि संतुलित आणि सकस आहारचे सेवन करावे तसेच सेंद्रिय पोषण बागेची गरज व अन्नातील रंगघटकाचे महत्व तसेच स्त्रिया मधील विविध कर्करोग



ह्या बद्दल जानजागृती केली यानंतर मूल्यवर्धित पाककला स्पर्धे मध्ये महिलांनी विविध पदार्थ तयार करून आणले होते ज्यामध्ये भरडध्यान वापरून इडली, अप्पे, थालीपीठ, चकली, डोसा, वडी, गव्हाच्या कण्याच्या मुटके अश्या पारंपरिक पाककृतीचा समावेश होता, ज्यामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय असे पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले. यानंतर आध्यक्षीय समारोप डॉ. एस. डी. मोरे (संचालक), कृषि विज्ञान केंद्र, यांनी केला यामध्ये पोषक आहार कसा घेतला पाहिजे व हा आहार घेताना प्रत्येक घटकाचे महत्व ओळखून ते किती प्रमाणात घेतले पाहिजे व महिलांनी स्वयरोजगार बद्दल के. वि. के पोखर्णी मध्ये येऊन प्रशिक्षण घ्यावे याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. माणिक कल्याणकर (पिक संरक्षण तज्ञ) यांनी केले. तसेच कृ.वि. के.चे डॉ.एम. एन.अंबोरे (पशुवैद्यक तज्ञ ), प्रा.एस.एच. जायभाये (कृषि विद्या तज्ञ ), श्री ए.जी भालेराव,श्री आर.आर. इंगोले,श्री आर.टी. वाडीले,श्री डी. आर.कदम, सौ.पी. एस. हाडोळतिकर, श्री एस.एस. गायकवाड,श्री आर.जी.राऊत आणि श्री.संतोष वाघमारे यांचे देखील हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता विशेष सहकार्य लाभले.

# डिजिटल मीडियामधील पत्रकारांच्या प्रश्नासाठी वेळप्रसंगी रस्त्यावर उतरू -एस.एम.देशमुख

**छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या पहिल्या राज्यस्तरीय अधिवेशनाला मोठा प्रतिसाद**

विशेष प्रतिनिधी : बालाजी सिरसाट छत्रपती संभाजीनगर : अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न डिजिटल मीडिया परिषदेच्या पहिले राज्यस्तरीय अधिवेशन छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहात पार पडले. यावेळी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांनी उपस्थित पत्रकारांना मार्गदर्शन करताना मोठी घोषणा केली आहे.डिजिटल मीडियामधील पत्रकारांना आजही शासन दरबारी पत्रकार म्हणून मान्यता दिली जात नाही, ही मोठी शोकांतिका आहे. एखादी बातमी काही क्षणामध्ये जगभर पोहोचवणाऱ्या डिजिटल मीडियातील पत्रकारांच्या प्रश्नांबाबत सरकार चालढकल करीत आहे. सरकारने तातडीने या पत्रकारांच्या प्रश्नाकडे लक्ष देण्याची गरज आहे. अन्यथा वेळप्रसंगी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद व डिजिटल मीडिया परिषद रस्त्यावर उतरून आंदोलन करू,' असा इशारा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी दिला आहे. माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री तथा खासदार डॉ. भागवत कराड, ज्येष्ठ पत्रकार तुळसीदास भोईटे, धनंजय लांबे, डॉ.अनिल फळे, रवींद्र पोखरकर यांनीही या अधिवेशनात मार्गदर्शन केले. याप्रसंगी मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टिवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, राज्य प्रसिद्धीप्रमुख संदीप कुलकर्णी, सह प्रसिद्धी प्रमुख भरत निगडे, उपाध्यक्ष गणेश मोकाशी, गो.पी.लांडगे, डीजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी, सचिव प्रकाश भगनुरे, कार्याध्यक्ष कानिफ अन्नपूर्णे, मुंबई प्रतिनिधी सुनील वाघमारे, उपाध्यक्ष महादेव जामनिक, कोषाध्यक्ष ब्रह्मानंद चक्करवार यांच्यासह राज्याच्या विविध भागातून आलेले पत्रकार उपस्थित होते. या अधिवेशनात पत्रकारांच्या समस्यांना वाचा फोडत देशमुख यांनी 'पत्रकारांच्या प्रश्नांना गांभीर्याने घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात' अशी मागणी केली. एस.एम. देशमुख म्हणाले, 'पत्रकार संरक्षण कायदा मंजूर होऊन सात वर्षे उलटली तरी सरकारने अधिसूचना काढलेली नाही. यु ट्युबवर काम करणाऱ्या पत्रकारांना पत्रकार म्हणून



मान्यता मिळालेली नाही, तसेच पेन्शन व अधिस्वीकृतीधारक पत्रकारांचे प्रश्न अद्याप प्रलंबित आहेत. राज्य सरकार पत्रकारांच्या प्रश्नांबाबत चालढकल करत आहे. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद सातत्याने पत्रकारांच्या प्रश्नांवर आवाज उठवत असते. प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक्स मीडियामधील पत्रकारांच्या प्रश्नांसाठी परिषदेच्या माध्यमातून विविध आंदोलने करण्यात आली आहे. या आंदोलनामुळे पत्रकारांच्या समस्या सुटण्यास देखील मदत झाली आहे. पण आता प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक्स मीडियामधील पत्रकारांसोबतच डिजिटल माध्यमात काम करणाऱ्या पत्रकारांच्या प्रश्नासाठी संघटनेचा लढा सुरू राहील, असेही देशमुख म्हणाले. डिजिटल मिडियातील पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका मिळाली पाहिजे, युट्यूब चॅनल साठी सरकारी जाहिराती मिळाल्या पाहिजेत आणि ज्या सवलती प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक मिडियातील पत्रकारांना मिळतात त्या सर्व सवलती डिजिटल मिडियातील पत्रकारांना देखील मिळाव्यात अशी आग्रही मागणी देशमुख यांनी केली.. या संदर्भात आपण लवकरच मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असल्याचे देशमुख यांनी सांगितले. या अधिवेशनाला माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री तथा खासदार डॉ. भागवत कराड यांनी देखील भेट दिली. यावेळी त्यांनी पत्रकारांच्या आरोग्यविषयक, रेल्वेविषयक व लघुउद्योगांना मदत मिळावी यासाठी मुद्रा लोनविषयी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी मी नेहमीच तत्पर आहे, असेही ते म्हणाले. अधिवेशनात ज्येष्ठ पत्रकार तुळशीदास भोईटे, रवींद्र पोखरकर, धनंजय लांबे, डॉ. अनिल फळे यांनी डिजिटल मीडियासंबंधी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ पत्रकार तसेच राज्याच्या विविध भागात डिजिटल माध्यम क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या पत्रकारांचा देखील सन्मान करण्यात आला.

# मअहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ रेल्वेमार्ग प्रकल्पासाठी १५० कोटी निधी वितरीत

## बीडकरांना पालकमंत्री अजित पवार यांच्याकडून मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची भेट

दि. १५ सप्टेंबर २०२५.मुंबई, दि. १५ :- बीड जिल्ह्याच्या विकासात गेम चेंजर ठरणाऱ्या ङ्गअहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथफ या महत्त्वाकांक्षी नवीन ब्रॉड गेज रेल्वेमार्ग प्रकल्पाला गती देण्यासाठी राज्य शासनाने आजवर तब्बल २ हजार ९१ कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्यात आज नव्याने १५० कोटींची भर घालून तो निधी आज वितरीत करण्यात आला आहे. या निधीच्या वितरणामुळे या रेल्वे प्रकल्पाच्या कामाला अधिक गती मिळणार असून, बीडकरांना उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची अनोखी भेट दिली आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या म ुहूर्तावर, म्हणजेच दि. १७ सप्टेंबर रोजी ङ्गबीड-अहिल्यानगरफ या टप्प्यावरील रेल्वेसेवेचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या ऐतिहासिक घटनेमुळे बीड जिल्ह्यातील लाखो नागरिकांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरणार आहे.अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथफ या प्रकल्पासाठी राज्य शासनाचा एकूण आर्थिक सहभाग ५० टक्के असून, आजवर शासनाने तब्बल २ हजार ९१ कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्यात आता नव्याने १५० कोटींची भर घालण्यात आली आहे. या निधीचा उपयोग २०२५-२६ या आर्थिक वर्षात रेल्वे विभागाला राज्य सरकारचा हिस्सा देण्यासाठी केला जाणार आहे. ङ्गअहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथफ हा रेल्वेमार्ग सुमारे २६१ किलोमीटर लांबीचा असून, त्याचा एकूण खर्च ४ हजार ८०५ कोटी रुपये इतका आहे. त्यातील ५० टक्के म्हणजे २ हजार ४०२ कोटी रुपये राज्य शासनाचा वाटा आहे. आजपर्यंत शासनाने तब्बल २ हजार ९१ कोटी २३ लाख रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्यात आता आणखी १५० कोटींची भर घालण्यात आली असून या निधीचे वितरण आज (दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी) करण्यात आले आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या दोन दिवस आधी वितरीत करण्यात आलेल्या या निधीमुळे या प्रकल्पाच्या विकासाला गती येणार आहे. या निधीचा उपयोग २०२५-२६ या आर्थिक वर्षात रेल्वे विभागाला राज्य सरकारचा हिस्सा देण्यासाठी होणार आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्वीकारल्यापासून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्याच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. विमानतळ, रेल्वे व रस्ते विकासाला चालना देण्यासाठी विभागीय, जिल्हास्तरीय तसेच मंत्रालयीन पातळीवर विविध बैठका घेऊन त्यांनी संबंधित विभागांमध्ये प्रभावी समन्वय साधला आहे. या प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम म्हणून ङ्गअहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथफ या महत्त्वाकांक्षी नवीन ब्रॉड गेज रेल्वेमार्ग प्रकल्पाला गती मिळाली आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुहूर्तावर बीड-अहिल्यानगरफ या टप्प्यावरील रेल्वे धावणार असून त्याचा थेट फायदा बीड जिल्ह्यातील लाखो नागरिकांना होणार आहे. अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ रेल्वेमार्ग म्हणजे बीड, अहिल्यानगर आणि परळी वैजनाथ भागातील शेतकरी, विद्यार्थी, उद्योजक, व्यापारी आणि सामान्य जनतेसाठी विकासाला नवी गती देणारा प्रकल्प आहे. या म ार्गामुळे जिल्ह्यातील गुंतवणूक वाढेल, रोजगारनिर्मिती होईल आणि वाहतूक सुलभ होईल. बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी हा प्रकल्प गतीम ान करण्याचा माझा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. बीड जिल्ह्याचा चेहरा बदलणाऱ्या या प्रकल्पामुळे बीडकरांच्या आयुष्यात नवा विकासप्रवास सुरू होईलङ्ख असा विश्वासही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १६ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## हसण्याने खरंच आयुष्य वाढतं?



नेहमी हसत राहावं,त्यामुळे मन तर खुश राहतं शिवाय आरोग्यही सुधारत, आयुष्य वाढतं असं आपण अनेकदा ऐकलं असेल. पण खरंच असं आहे का? याचे काही पुरावे आहेत का? तर विज्ञान आणि आयुर्वेदाने हसण्याबद्दल सांगितलेलं सत्या जाणून घेऊयात.

आजच्या धावपळीच्या आणि धकाधकीच्या जीवनात लोक अनेकदा हसणे विसरतात, परंतु सत्य हे आहे की हास्य हे केवळ मूड सुधारण्याचे साधन नाही तर आरोग्यासाठी सर्वात सोपा आणि मोफत टॉनिक आहे. असं म्हणतात की हास्याद्वारे नैसर्गिक ताणतणाव दूर करते. पण विज्ञान आणि आयुर्वेद दोघेही मानतात की हास्य शरीर आणि मनाला रिचार्ज करते, तणावाची पातळी कमी करते आणि दीर्घायुष्याचे रहस्य दडलेले आहे.

'ते प्रेम होते कारण....' अमिताभ बच्चन यांना इम्प्रेस करण्यासाठी रेखाने केला होता या गोष्टीचा त्याग हास्य ही केवळ भावना नाही तर आरोग्यासाठी एक टॉनिक आहे. विज्ञान आणि आयुर्वेद दोघेही मानतात की दररोज हसल्याने ताण कमी होतो, रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि आयुर्मान वाढते.

> हसण्याच्या फायद्याबद्दल विज्ञान काय म्हणते?

आधुनिक विज्ञान असे मानते की हास्य हे एखाद्या नैसर्गिक औषधापेक्षा कमी नाही.

हसताना, मेंदूतून एंडोर्फिन आणि डोपामाइन बाहेर पडतात, जे त्वरित ताण कमी करतात.

रक्ताभिसरण सुधारते आणि हृदय निरोगी राहते.

संशोधनानुसार, दररोज 10-15 मिनिटे हसणे हे हलक्या व्यायामाइतकेच फायदेशीर आहे.

हसण्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते, स्मरणशक्ती चांगली राहते आणि मन ताजेतवाने राहते.

>हसण्याच्या फायद्याबद्दल आयुर्वेद काय म्हणते?

आयुर्वेदात हास्याला एक नैसर्गिक औषध म्हटले आहे, जे शरीर आणि मनाचे संतुलन राखते.

हसण्यामुळे वात-पित्त-कफ यांचे संतुलन सुधारते.

पचनक्रिया सुधारते आणि झोपही चांगली येते.

आयुर्वेद मानतो की आनंदी राहणे आणि हसणे तुमचे आयुष्यमान थेट वाढवते.

हेच कारण आहे की योग आणि ध्यानासोबतच हास्य हे दीर्घायुष्याचा एक महत्त्वाचा भाग मानले जाते.

> दररोज हसण्याची सवय कशी लावायची?

तुमची सकाळची सुरुवात हास्य योगाने करा.

कुटुंब आणि मित्रांसोबत वेळ घालवा आणि मोठ्याने हसा.विनोदी कार्यक्रम पहा, मजेदार पुस्तके वाचा किंवा मुलांसोबत खेळा.

लहान आनंद आणि मोठ्याने हसणे केवळ निरोगी शरीर आणि मनच देत नाही तर तुमचे आयुष्य दीर्घ आणि आनंदी बनवते

## शालेय साहित्य, गरिबांना किराणा किट वाटप हे माझे सामाजिक कार्य – सिमा ओस्तवाल
### गुरु आनंद महिला प्रतिष्ठाण, बीड आयोजितप्रयास फाऊंडेशन, मुंबई शालेय साहित्य वाटप

बीड प्रतिनिधी बीड येथील गुरु आनंद महिला प्रतिष्ठाण, बीड आयोजित प्रयास फाऊंडेशन, मुंबई यांच्या सहकार्याने म ाय छोटा स्कूल बीड या ठिकाणीमोफत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. वार रविवार दि. १४.०९.२०२५. रोजी सकाळी १०.०० वा.आयोजित कार्यक्रम ाचे अध्यक्ष सौ. सिमा मनोज ओस्तवाल (अध्यक्ष गुरु आनंद महिला प्रतिष्ख्राण, बीड.)या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.श्री. चंद्रकांत शेळके साहेब (तहसीलदार बीड) बाळासाहेब पिंगळे मा. जिल्हा प्रमुख तसेंच ❋ प्रमुख उपस्थितीत यावेळी मा.श्री. सुरेश तात्या शेटे मा.श्री. झुंजार धांडे मा.श्री. भिकू शिंदे सो. रुक्मिण ताई



नागापुरे ` आयेशा रफिक शेख ` मा.श्री. भागवतजी वैद्य सर मा.श्री. लक्ष्मण इंगोले `मधुकर धांडे सों. मोनिका शिंदे मॅडम ` सों. विद्या धन्वे मॅडम सॉ. ज्योती चव्हाण मॅडम सों. गीता चव्हाण मॅडम सौ. पूजा पिंगळे मॅडम (प्रिन्सिपॉल माय छोटा स्कूल बीड) लक्ष्मण ठापुर, जाजदर पन्हाळकर, अंकुश आगछे संदीप आदमाणे चंद्रसेन मन्यारी, आओमप्रकाश कराय बाबा पंडीत माऊली तपाये.उपस्तित होते. यावेळी प्रमुख पाहुणे यांची भाषणे झाली. शेवटी कार्यक्रम चे अध्यक्ष सिमा ओस्तवाल मॅडम यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मी आतापर्यंत एक लाख पाटी, पेन, पेन्सिल, वह्या वाटप केल्या आहेत. अजूनही प्रोग्राम सुरूच आहेत. दीपावली निमित्त गोरगरीब लोकांना किराणा किट देखील वाटप करून गरिबांची दीपावली गोड आणि आनंदात साजरी करण्याचे भाग्य मला मिळते. यासारखे दान देणाऱ्यांनी पुढे यावे. या निमित्ताने सांगावसे वाटते. हे काम माझे एकट्याचे नाही. आपण सर्व जण मिळून करू असे ही यावेळी सीमा मॅडम यांनी म्हंटले. या शालेय साहित्य वाटप प्रोग्राम साठी मोठया संख्येने विध्यार्थी पालक उपस्तित होते.

## चकलांबा महसूल मंडळात अतिदृष्टी दोन दिवसापासून सततसुरु झालेल्या जोरदार पावसामुळे संपूर्ण जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण झाली आहे

### शासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्याला मदत द्यावी शिवसेना नेते फिरोज भैया शेख यांची मागणी



(चकलांबा प्रतिनिधी )
चकलांबा सर्कल खूप मोठे असून या सर्कल मध्ये ८० टक्के लोक शेतीवर आधारित असून दोन दिवसापासून परतीच्या पावसामुळे चकलांबा परिसरात नद्या, नाले छोटे-मोठे तलाव आणि ओढे तुडुंब भरले असून अनेक ठिकाणी पाणी रस्त्यावरून वाहू लागले आहे.



विशेषतः चकलांबा सर्कल परिसरात दोन दिवसापासून सतत पावसामुळे व रविवारी संध्याकाळी अतिवृष्टी झाली असून शेतकऱ्यांचे पिके धोक्यात आली आहे व शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचल्यामुळे मुळे त्यांची पिके धोक्यात आली आहे यामुळे बीड जिल्हा प्रशासनाने त्याची तातडीने दखल घेऊन पाहणी करून उपाययोजना कराव्यात व शेतकऱ्यांचे झालेले नुकसान तातडीने नोंदवावे व पंचनामे करून योग्य तो शेतकऱ्यांना दिलासा व नुकसान भरपाई द्यावी- शिवसेना सर्कल प्रमुख फिरोज भैया शेख यांनी मागणी केली आहे

## सरकार पूल बांधून देता का ? हो फुल
### पुरामुळे फुलच गेला वाहून,अनेक गावांचा संपर्क तुटला, दळणवळणाचा मार्ग बंद

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथील सततच्या पावसामुळे पूर येऊन गावाबाहेरील भिवरा नदीचा पूल पावसाच्या पाण्यामुळे पूर्णपणे खचून गेला असून अतिवृष्टीच्या पावसामुळे तो फुल सर्वच वाहून गेल्याने आता मात्र गावकऱ्यांना दळणवळणासाठी तसेच शाळकरी विद्यार्थ्यांना रस्त्या अभावीत त्या खडतळ रस्त्यातूनच पायपीट करावी लागत असून प्रशासनाने तात्काळ हा पूल बांधून देण्याची ग्रामस्थांची मागणी केली आहे.मारतळा आणि परिसरातील उमरा, गोळेगाव, पिंपळदरी, वाळकी खुर्द, कापसी खुर्द, धनंज खुर्द, हिंदोळा करमाळा, सुगाव, कांजाळा या भागात शनिवारी व सोमवारी सायंकाळी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला. उमरा गावाजवळील भिवरा नदीला पूर




येऊन पूल वाहून गेल्याने लाडका, परमेश्वर तांडा आणि रूपसिंग तांड्याचा संपर्क तुटला आहे. तसेच परिसरातील काढणीस आलेली सोयाबीन, कापूस या पिकांत पाणी साचल्याने अतोनात नुकसान झाले आहे. सततच्या पावसामुळे आधीच पिके सडलेली असून, पिकांसोबतच शेतीचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. मागील पंधरा दिवसांपूर्वीच उमरा व परिसरामध्ये अद्दश्य ढगफुटी झाल्यामुळे त्यावेळीही गावाशेजारील भिवरा नदीला आलेल्या पुरामुळे मातंगवस्ती दलितवस्ती आदी ठिकाणी पुराचे पाणी घरात घुसून अन्नधान्यांसह संसार उपयोगी वस्तूंचेही प्रचंड नुकसान झाले,शेतीसह घरांची पडझड झाली त्यामध्ये जनावरही दगावली. त्यावेळी पालकमंत्र्यांच्या दौऱ्यावेळी प्रशासनाने पंचनामे करून कोणताही मोबदला मिळाला नसून प्रशासनाचे अधिकारी कर्मचारी आले कागदावरच शेतकऱ्यांचं दुःख खरडून गेले नेतेमंडळी येऊन आश्वासनाचा नुसताच डोंगरच पसरून गेले. हीच स्थिती पाहायला मिळाली. पण अजून तरी त्या शेतकऱ्यांना कुठलीही मदत मिळाली नाही मदतीपासून पूरग्रस्त शेतकरी वंचितच आहेत.

## शासनाने अतिवृष्टी पावसाने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई द्यावी - आ.संदीप क्षीरसागर

### शेतकऱ्यांना, नागरिकांना स्वतःची आणि आपल्या पशुधनाची काळजी घेण्याचे केले आवाहन

बीड दि. १५ (प्रतिनिधी) बीड जिल्हासह शहर आणि तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने शेतकऱ्यांचे आणि ग्रामस्थांचे नुकसान झाल्याने शासनाने नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. बीड शहर व तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर काल रात्रीपासून मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्यामुळे बिंदुसरा तसेच इतर छोटे-मोठे तलाव,नदी,ओढे तुडुंब भरले असून पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. काल रात्री झालेल्या पावसाने पीक, पशुहानी, शेतकरी बांधव व ग्रामस्थांचे मोठे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा.ना.अजित दादा पवार तसेच बीडच्या जिल्हाधिकारी यांना बीड विधानसभेचे आ.संदीप क्षीरसागर यांनी पत्र देऊन केली आहे. बीड विधानसभा क्षेत्रातील बीड व शिरूर (का) तालुक्यातील सर्वच महसूल मंडळामध्ये दि.२८ ऑगस्ट २०२५ दरम्यान झालेल्या आणि १३ सप्टेंबर २०२५ पासून ते आजपर्यंत सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पावसाने



क्षेत्रातील उभा असलेला सोयाबीन, कापूस, बाजरी आदी पिकांचे तथा फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच शेतकरी बांधवांच्या पाळीव पशुधनाचे देखील नुकसान झाले आहे. यासह शहरी व ग्रामीण भागात देखील पावसामुळे मोठी पडझड झाली आहे. आजपर्यंत सुरु असलेल्या अतिवृष्टीच्या पावसाने विद्युत पोल, तारा व रोहित्र नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे शासनाच्या वतीने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकरी बांधवांना व ग्रामस्थांना सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी बीड विधानसभेचे आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

******

### शेतकऱ्यांनी, नागरिकांनी स्वतःची आणि आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी

पूर परिस्थिती निर्माण झाल्याने प्रशासनाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी व नागरिकांना स्वतःच्या आणि आपल्या पशुधनाची सुरक्षिततेसाठी काळजी घेण्याचे तसेच आज दिवसभर अतिवृष्टीची शक्यता वर्तवली आहे त्यामुळे गरज असेल तरच घराबाहेर पडा तसेच आपल्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाशी संपर्कात राहून आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

### आ.संदीप भैय्यांनी अधिकाऱ्यांना खबरदारी घेण्याच्या सूचना करत तात्काळ पंचनामे करण्यासाठी पत्र दिले

अतिवृष्टीमुळे मतदार संघातील सर्वच तलाव पुर्ण क्षमतेने भरलेले आहेत. अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, जायकवाडी यांना खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना कार्यकारी अभियंता यांना रस्ते व पुलाचे तात्काळ पंचनामे करणेसाठी पत्र व्यवहार देखील केला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १६ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# भारताने डोनाल्ड ट्रम्प यांना अखेर झुकवलेच, करार करण्यास तयार,

## भारत, चीन आणि रशिया एका मंचावर येण्याचेही तेच मोठे कारण होते. शेवटी अमेरिकेला भारताने झुकवले आहे.

टॅरिफमुळे भारत आणि अमेरिकेतील मागील काही वर्षांपासूनचे चांगलेच संबंध ताणले आहेत. हेच नाही तर भारतावर थेट टीका केली जात होती. डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांचे सहकारी मध्यतंरी भारताबद्दल धक्कादायक विधाने करताना दिसले. भारताने अमेरिकेच्या अटी मान्य केल्या नसलयाने त्यांचा थयथयाट बघायला मिळाला. भारत हा रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने अमेरिकेला पोटदुखी उठले आणि त्यांनी थेट म्हटले की, रशिया आणि युक्रेन युद्धाचा शांतीचा मार्ग हा दिल्लीहून जातो. जर भारताने रशियाकडून तेल खरेदी बंद केली तर युक्रेन-रशिया युद्ध थांबेल. भारत हा रशियाकडून तेल खरेदी करून मोठा पैसा कमावत आहे आणि रशियाला पैसा पुरवत आहे. याच पैशांचा वापर रशिया युक्रेन विरोधातील युद्धात वापरतोय भारतावर टॅरिफ लावल्यानंतर दोन्ही देशांमध्ये व्यापार चर्चा बंद होत्या. हेच नाही तर भारतातून अमेरिकेत जाणारी 70 टक्के निर्यात कमी झाली. असे नाही की, निर्यात कमी झाल्याने फक्त भारतालाच फटका बसतोय. अमेरिकेला देखील याचा जोरदार फटका बसताना दिसतोय. अमेरिकेत अंडी, चिकन



बटाटे यांचे भाव गगणाला पोहोचल्याचे सध्या बघायला मिळत आहे. भारतातून होणारी निर्यात बंद झाल्याने त्याचा परिणाम थेट अमेरिकेच्या मार्केटवर दिसत आहे. 27 ऑगस्टपासून भारत आणि अमेरिकेतील व्यापार चर्चा बंद होती. आता परत एकदा दोन्ही देशांमध्ये समोरासमोर बसून व्यापार चर्चा होणार आहे. अमेरिकेच्या अधिकाऱ्यांचे एक शिष्टमंडळ मंगळवारी नवी दिल्लीत येत आहे. त्यांचे नेतृत्व दक्षिण आणि मध्य आशियासाठी सहाय्यक अमेरिकन व्यापार प्रतिनिधी ब्रेंडन लिंच करतील. या बैठकीला येण्यापूर्वी त्यांनी स्पष्ट केले की, आम्ही व्यापाराचे भविष्य पाहण्यासाठी येतोय. या बैठकीत फक्त व्यापाराशी संबंधित चर्चा होईल. द्विपक्षीय व्यापार करार देखील होतील. विशेष म्हणजे या बैठकीत अमेरिका सीफूडबद्दलचा मोठा करार भारतासोबत करू शकते. गेल्या आठवड्यात ट्रम्प यांनी पुढे येत भारतासोबत व्यापार चर्चा करणार असल्याचे म्हटले. हेच नाही तर त्यांनी भारत आणि अमेरिकेतील संबंध मजबूत असून नरेंद्र मोदी हे माझे खूप चांगले मित्र आहेत आणि राहणार असल्याचे त्यांनी म्हटले. आता त्यांनी व्यापार मंडळाला चर्चेसाठी पाठवले आहे. अगोदर टॅरिफमध्ये हा दौरा रद्द करण्यात आला होता.

# सुनीलभाऊ साळवे यांच्या कुटुंबावर प्राणघातक हल्ल्याचा पाटोद्यात सर्वपक्षीय निषेध

पाटोदा (प्रतिनिधी) अहिल्यानगर जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) जिल्हाध्यक्ष सुनीलभाऊ साळवे यांच्या कुटुंबावर नान्नज (ता. जामखेड) येथे झालेल्या प्राणघातक हल्ल्याचा तीव्र निषेध पाटोदा येथे करण्यात आला. सोम वारी (दि. १५ सप्टेंबर २०२५) सकाळी अकरा वाजता तहसील कार्यालयासमोर विविध पक्ष व सामाजिक संघटनांच्या वतीने भव्य निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात विविध पक्षातील नेते, रिपब्लिकन पार्टीसह अनेक संघटनांचे कार्यकर्ते, पदाधिकारी व शेकडो नागरिक सहभागी झाले. सर्वांनी एकमुखाने दोषींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा करण्याची मागणी केली.आंदोलनादरम्यान हल्लेखोरांना शिक्षा करा!, साळवे कुटुंबाला न्याय द्या! न्याय मिळाला नाही तर तीव्र लढा उभारू!अशा घोषणांनी तहसील परिसर दणाणून गेला. वातावरण संतप्त व तणावपूर्ण बनले होते. निदर्शनावेळी सर्वपक्षीय नेत्यांनी भाषणे करताना प्रशासनावर कठोर टीका केली. त्यांनी स्पष्ट केले की, हा हल्ला एका कुटुंबावर



नसून संपूर्ण समाजावर आहे. दोषींना तातडीने अटक करून कठोर शिक्षा झाली पाहिजे. अन्यथा जिल्हाभर उग्र आंदोलन उभे राहील. तसेच साळवे कुटुंबाला शासकीय पातळीवर तात्काळ सुरक्षा पुरवण्याची मागणीही करण्यात आली. निदर्शनानंतर सर्वपक्षीय शिष्टमंडळाने तहसीलदारांना निवेदन सादर केले. या निवेदनात दोषींना अटक करून कठोर कारवाई करण्याचा ठाम इशारा देण्यात आला.या हल्ल्यामुळे सम ाजात भीती व संतापाचे वातावरण असून,दोषींना तात्काळ अटक न झाल्यास पुन्हा आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.



## नगरपरिषद मुख्याधिकारी साहेब, शहरात पाणी घुसले, जिम्मेदार कोण? :- शेख युनूस

बीड (प्रतिनिधी) शहरात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पावसाळ्यापूर्वी कोणतेही ठोस नियोजन नसल्यामुळे मोमीनपुरा भागात घरात पाणी शिरले. पावसाचे पाणी नाल्यातून वाहत असून नागरिकाच्या घरात शिरत आहे. पावसाळ्यापूर्वी नाल्याची साफसफाई करणे गरजेचे होते.पण असे झाले नाही, याला जिम्मेदार कोण? नगरपरिषद, आमदार, खासदार की पालकमंत्री?जागोजागी कचऱ्याचे ढिगारे जमा झालेले आहेत. सध्या सणासुदीचे दिवस आहेत आणि त्यात पावसाच्या पाण्यामुळे प्रत्येक गल्ली बोळात नाल्या तुंबलेल्या असल्यामुळे रोड वरून पाणी जात आहे.आणि नागरिकाला त्यापासून आरोग्याला धोका निर्माण होत आहे. नगरपरिषद दुर्लक्ष करीत असल्यामुळे शहरात प्रत्येक जाग्यावर कचऱ्याचे ढिगारे जमा झालेले आहे. जाणून बुजून नगरपरिषद दुर्लक्ष करीत आहेत की काय असं नागरिकाकडून बोलले जात आहे. जनतेची अपेक्षा आहे की, शहराला सुंदर बीड ,स्वच्छ बीड ठेवावे.

## पुन्हा आरक्षणाचा प्रश्न पेटणार, बंजारा समाजाच्या मागणीविरोधात आदिवासी नेते एकवटले

राज्यात मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटप्रमाणे आरक्षण दिलं जाणार आहे, परंतु या गॅझेटमध्ये बंजारा समाजाचा उल्लेख आदिवासी असा आहे, त्यामुळे आता बंजारा समाज देखील आक्रमक झाला आहे, आमचा समावेश हा आदिवासींमध्ये अर्थात एसटी प्रवर्गात करावा अशी मागणी या समाजाची आहे, तर दुसरीकडे आदिवासी समाजामधून मात्र या मागणीला जोरदार विरोध होत आहे. आमच्यामध्ये कोणालाही घुसू देणार नाही, अशी भूमिका आदिवासी समाजाची आहे, आदिवासी समाजाचे सर्व नेते याविरोधात एकत्र आल्याचं पहायला मिळत आहे, त्यामुळे आता आदिवासी समाज आणि बंजारा समाज आमने-सामने आल्याचं पहायला मिळत आहे. आमदार आमश्या पाडवी यांनी बंजारा समाजाच्या या मागणीला जोरदार विरोध केला असून, ते चांगलेच आक्रमक झाले आहेत, शासनाने बंजारा समाजाला आरक्षण दिल्यास मी सत्तेमधून बाहेर पडणार, मात्र मी जोपर्यंत जिवंत आहे.

# वडवणी तालुक्यात शिवसेना पदाधिकारी निवड; नियुक्तीपत्रांचे वाटप

बीड, प्रतिनिधी - हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने तसेच उपमुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख मा. एकनाथजी शिंदे आणि खासदार श्रीकांतजी शिंदे यांच्या आदेशानुसार, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या सूचनेवरून शिवसेना वडवणी तालुक्यातील पदाधिकारी निवडी काल दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी शिवसेना



मध्यवर्ती कार्यालय, बीड येथे दुपारी १.०० वाजता पार पडल्या. या निवडीदरम्यान विविध स्तरांवरील पदांची जबाबदारी निश्चित करण्यात आली. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना त्यांची नियुक्तीपत्रे देऊन औपचारिक नियुक्ती करण्यात आली. या प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल भैय्या गलधर, युवासेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर (माऊली) गोंडे, रामदास ढगे, संदीप माने, शिवाजी गोंडे, मसुराम गोंडे यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवड प्रक्रियेने वडवणी तालुक्यातील शिवसेना संघटनेला नवे बळ मिळाले असून, नव्याने नियुक्त पदाधिकारी आगामी काळात शिवसेनेची विचारधारा आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विकासाभिमुख कार्य घराघरांत पोहोचविण्यासाठी कटिबद्ध राहतील, असा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# राज्यात परतीच्या पावसाचा धुमाकूळ, पुढील 48 तास महत्त्वाचे; तुमचा जिल्हा रेड की यलो झोनमध्ये?

महाराष्ट्रात सध्या परतीचा पाऊस सुरु झाला आहे. यामुळे राज्यात पावसाचा जोर चांगलाच वाढला आहे. पुणे वेधशाळेने वर्तवलेल्या अंदाजानुसार, आज संपूर्ण महाराष्ट्र आणि गोव्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाने रायगड, पुणे जिल्ह्याचा घाट विभाग आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. यामुळे नागरिकांना सतर्क राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. गेल्या २४ तासांमध्ये राज्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टीची नोंद झाली आहे. यामुळे मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघरमध्येही जोरदार पाऊस झाला आहे.हवामान विभागाचा अंदाज काय? गेल्या २४ तासांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पावसाने जोरदार हजेरी लावली. रायगड जिल्ह्यातील माथेरान येथे सर्वाधिक २७१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. सध्या मान्सूनच्या परतीचा प्रवास राजस्थान, गुजरात आणि पंजाबच्या काही भागातून दोन ते तीन दिवसांत सुरू होण्याची शक्यता आहे. पण सध्या महाराष्ट्रातील पूर्व विदर्भ आणि परिसरावर चक्राकार वारे वाहत आहे. यामुळे राज्यात पावसासाठी पोषक हवामान निर्माण झाले आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील दोन दिवस महाराष्ट्रासह गोवा, पश्चिम बंगाल, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि पूर्वेकडील राज्यांमध्येही मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यामुळे नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन करण्यात आले आहे. नैऱ्ऋत्य मोसमी वाऱ्यांचा म्हणजेच मान्सूनचा परतीचा प्रवास पश्चिम राजस्थानमधून सुरू झाल्याने महाराष्ट्रात पावसाचा जोर चांगलाच वाढला आहे.

कोणकोणत्या जिल्ह्यांसाठी अलर्ट जारी? पुणे वेधशाळेने दिलेल्या माहितीनुसार, आज महाराष्ट्रातील अनेक भागांत वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाची शक्यता आहे. काही जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट तर बहुतांश जिल्ह्यांसाठी येलो अलर्ट जारी



करण्यात आला आहे. ज्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

रायगड, पुणे जिल्ह्याचा घाट विभाग आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांना हवामान विभागाने 'ऑरेंज अलर्ट' दिला आहे. या भागांमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे. विशेषतः रायगड, पुणे घाटमाथा आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये अतिवृष्टी होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना आवश्यक असल्यासच घराबाहेर पडण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.या जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस

तर मुंबई, ठाणे, पालघर, रत्नागिरी, जळगाव, नाशिक घाटमाथा, अहिल्यानगर, सातारा घाटमाथा, बीड, बुलढाणा, अकोला आणि अमरावती या जिल्ह्यांसाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे. याव्यतिरिक्त, नंदूरबार, धुळे, नाशिक, पुणे, सांगली, सोलापूर, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशीव, वाशीम, यवतमाळ, नागपूर, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com